सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सातारा सैनिक शाळेला योजनेतर (वेतनेतर) अनुदानासाठी निधी वितरणास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सासैशा २०१७/प्र.क्र.१७३/एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - १८ ऑक्टोबर, २०१७

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई क्रमांकः अर्थसं २०१७/ प्र.क्र.७५/अर्थ ३, दिनांक १८.४.२०१७
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई क्रमांकः पूरक२०१६/प्र.क्र.९९/अर्थसंकल्प-३ दिनांक ३०.६.२०१७
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. अनुवि४९१७/(३२/१७)/अर्थसंकल्प, दिनांक २.८.२०१७
४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचे क्र. सासैशा-२०१७-१८/ अंदाजपत्रक/माध्य/३०३/६०६५, दिनांक २८.९.२०१७ चे पत्र

प्रस्तावना-

सातारा सैनिकी शाळेची स्थापना दि. २३ जून १९६१ रोजी झाली असून सदर शाळा ही देशातील पहिली सैनिकी शाळा आहे. महाराष्ट्रातील तळागळातील व सर्व स्तरावरील गरीब व होतकरू मुलांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून भारतातून सैन्य दलात अधिकारी पदावर संधी मिळावी, हा या शाळेचा मुख्य उद्देश आहे. या शाळेतून मोठया प्रमाणावर विद्यार्थी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये आतापर्यंत भरती झाले आहेत.

सातारा सैनिक शाळेला प्रतिवर्षी इमारत देखभाल, आहारभत्ता, घोडा देखभाल, जाहिरात खर्च, नगरपालिका कर या प्रयोजनार्थ योजनेतर (वेतनेतर) अनुदान मंजूर करण्यात येते. सैनिक स्कूल सोसायटी व राज्य शासन यांच्यामध्ये सातारा सैनिक शाळेसंदर्भात ३० डिसेंबर,२०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार सातारा सैनिक शाळेतील निवृत्तीवेतन व निवृत्त कर्मचा-यांना अनुज्ञेय लाभ आणि प्रशिक्षण व व्यवस्थापन खर्च याचा समावेश करुन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांनी सातारा सैनिक शाळेचे रु. ७,३०,९९,७६३/- इतक्या रकमेचे बाबनिहाय सुधारीत अंदाजपत्रक संदर्भाधीन दिनांक २८.९.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केले आहे. सदर अंदाजपत्रकातील निवृत्तीवेतन व निवृत्त कर्मचा-यांचे फायदे आणि प्रशिक्षण व व्यवस्थापन खर्च, घोडादेखभाल, जाहिरात खर्च, नगरपालिका कर या बाबीसाठी लागणाऱ्या एकूण रुपये ३,५७,५५,४४३/- खर्चाच्या ७०% च्या मर्यादेत रु.२,५०,२८,८१०/- इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण,०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२ ०४६९) , ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रू. ६,६३,४८,०००/- इतकी अर्थसंकल्पीय मंजूर तरतूद उपलब्ध आहे. वित्त विभागाच्या दिनांक ३०/६/२०१७ च्या परिपत्रकातील आदेशानुसार ७० टक्के निधीच्या मर्यादेत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सातारा सैनिक शाळेस खालील बाबींवरील खर्चासाठी रुपये २,५०,२८,८१०/--(रुपये दोन कोटी पन्नास लाख अठ्ठावीस हजार आठशे दहा फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	खर्चाची बाब	सन २०१७-१८ मध्ये आवश्यक निधी (रुपये)	निधीच्या ७० टक्के वितरीत करावयाचा निधी (रुपये)
१	निवृत्तीवेतन व निवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे फायदे	२,४६,५८,०००	१,७२,६०,६००
२	प्रशिक्षण व व्यवस्थापकीय खर्च	८१,४९,०००	५७,०४,३००
३	घोडा देखभालीसाठी	२३,३२,०००	१६,३२,४००
४	जाहिरात खर्चासाठी	३,८०,३०४	२,६६,२१३
५	नगरपालिका करासाठी	२,३६,१३९/	१,६५,२९७
	एकूण	**३,५७,५५,४४३**	**२,५०,२८,८१०**

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सहायक संचालक (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे यांना या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणा-या निधीकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ व क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.६.२०१७ मधील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन परिपत्रक, दिनांक ३०.६.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०१८१६२६५००१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2017.10.18 16:15:06 +05'30'

(संगिता शेळके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री सचिवालय
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३. मा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
४. मा.विधानसभा /विधानपरिषद सर्व सदस्य
५. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
६. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
८. विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे
९. सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, पुणे
१०.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा.
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
१२.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१४.वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
१५.प्राचार्य, सैनिकी स्कूल, सातारा
१६.सचिव, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१७.मानद सचिव, बोर्ड ऑफ गव्हर्नर सैनिकी स्कूल, नवी दिल्ली.
१८.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.वित्त विभाग, व्यय-५/अर्थसंकल्प-३ मंत्रालय, मुंबई-३२
२०.निवड नस्ती (एसएम-६).